RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ५, अंक १३८] शुक्रवार, ऑक्टोबर ११, २०१९/आश्विन १९, शके १९४१ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३८६**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ ऑक्टोबर २०१९.

### अधिसूचना

**महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७.**

क्रमांक संकीर्ण. २०१९/प्र.क्र.३४१/टीएनटी-१.— महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा. ३) याच्या कलम १६ ची पोट-कलमे (१) व (२) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम, १९८१ मध्ये आणखी सुधारणा करण्याचे प्रस्तावित केलेल्या नियमांचा पुढील मसुदा, त्यामुळे बाधा पोहचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम १६, पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा दिनांक २६ ऑक्टोबर २०१९ रोजी अथवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

### नियमांचा मसुदा

१. या नियमांस, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) (सुधारणा) नियम, २०१९ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम २ च्या (यात यापुढे ज्याचा निर्देश मूळ नियमावली असा करण्यात आला आहे.) पोट नियम (१) च्या—

(१) खंड (इ-१), मध्ये पुढील पोट नियम समाविष्ट करण्यात येईल :—

" शिक्षक पात्रता चाचणी " म्हणजे, अभियोग्यता चाचणी देण्यासाठी पात्र असलेल्या उमेदवारांकरिता राज्य शासन अथवा केंद्र शासन याद्वारे किंवा राज्य शासन अथवा केंद्र शासन यांनी प्राधीकृत केलेल्या अभिकरणाद्वारे घेण्यात येणारी चाचणी ;";

(२) खंड (ग) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ग-१) " अंशतः अनुदानीत शाळा " म्हणजे शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून कोणत्याही स्वरुपात कोणत्याही प्रकारचे आर्थिक किंवा बिगर आर्थिक आवर्ती/अनावर्ती अशंतः अनुदान किंवा सहाय्य घेणारी शाळा ;";

(३) खंड (ई-अ) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ई-अ) "स्वयं अर्थसहाय्यीत शाळा" म्हणजे महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमन, २०१२ नुसार स्थापन केलेली कोणत्याही माध्यमाची शाळा, आणि या अधिनियमापूर्वी अस्तित्वात असलेली, शासनाकडून किंवा समुचित प्राधिकरणाकडून कोणत्याही स्वरुपात कोणत्याही प्रकारचे आवर्ती अनुदान किंवा सहाय्य दिले जात नसलेली कायमस्वरुपी स्वतःच्या उत्पन्नातून चालविली जाणारी शाळा ;";

(४) खंड (ल) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(म) "विना अनुदानित शाळा" म्हणजे शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून कोणत्याही स्वरुपात कोणत्याही प्रकारचे आर्थिक किंवा बिगर आर्थिक आवर्ती अनुदान किंवा सहाय्य दिले जात नसलेली मात्र अनुदानास पात्र असलेली (इंग्रजी माध्यम वगळून) शाळा ;".

३. मूळ नियमावलीमधील नियम ६ च्या पोट नियम (२) ऐवजी पुढील पोट नियम दाखल करण्यात येईल :—

"(२) खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित, विना अनुदानित (स्वयं अर्थ साहाय्यीत शाळा वगळून) शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ८ वी साठी शिक्षक किंवा शिक्षण सेवकांची नियुक्ती करण्यासाठी शासन किंवा शासनाने प्राधिकृत केलेले प्राधिकरण, वेळोवेळी शिक्षक पात्रता चाचणी आणि अभियोग्यता चाचणी घेईल.

(२अ) खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित, विना अनुदानित शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ८ वी साठी शिक्षक किंवा शिक्षण सेवकांची नियुक्ती करण्यासाठी (अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती वगळून) शासन अथवा शासनाने प्राधिकृत केलेले प्राधिकरण, वेळोवेळी अभियोग्यता चाचणी घेईल.

(२-ब) खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित, विनाअनुदानित (स्वयं अर्थ साहाय्यीत शाळा व अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती वगळून) शाळांमध्ये इयत्ता ९ वी ते १२ वी साठी शिक्षक किंवा शिक्षण सेवकांची नियुक्ती करण्यासाठी शासन किंवा शासनाने प्राधिकृत केलेले प्राधिकरण, वेळोवेळी अभियोग्यता चाचणी घेईल.".

४. मूळ नियमावलीच्या नियम ९ मध्ये पोट नियम २ (ब) ऐवजी खालील पोट नियम दाखल करण्यात येतील :—

"(२-ब) उक्त जाहिरात, संबंधित पद भरण्यापूर्वी किमान १५ दिवसांसाठी खुली ठेवण्यात येईल. उक्त जाहिरातीस प्रतिसाद देऊन रिक्त पद भरण्याकरिता उमेदवारांना ऑनलाईन प्रक्रियेमार्फत अर्ज करता येईल किंवा नाव, पत्ता, जन्मतारीख शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, अनुभव इत्यादींचा सविस्तर तपशील व अभियोग्यता चाचणीत प्राप्त केलेले गुण आवेदनपत्रात देऊन लेखी अर्ज करता येईल.

(२-क) जाहिरातीत नमूद केलेली मुदत संपल्यानंतर शिक्षणाधिकारी किंवा विभागीय संचालक प्रकरणपरत्वे १:१० या गुणोत्तराप्रमाणे एका रिक्त पदासाठी अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण १० उमेदवारांची नावे उपलब्ध करून देतील. त्यानंतर मुलाखतीद्वारे शाळा समिती उमेदवाराची निवड करील. शाळा समितीने अभियोग्यता चाचणीत उच्च गुण असलेल्या उमेदवाराची निवड न केल्यास व्यवस्थापन त्यासंबंधीची कारणे नमूद करेल :

परंतु, अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण केलेल्या व शिक्षणाधिकारी यांनी ऑनलाईन गुणवत्ता यादीत समाविष्ट केलेल्या उमेदवारांची मुलाखतीशिवाय निवड व्यवस्थापन करू शकेल.

(२-डी) व्यवस्थापन निवडलेल्या उमेदवारांची नावे पाच कामकाजाच्या दिवसांत पवित्र पोर्टलवर प्रकाशित करील आणि निवड झालेल्या उमेदवारांची नावे प्रकरण परत्वे संबंधित शिक्षणाधिकारी किंवा विभागीय संचालकांना कळवील.".

५. मूळ नियमावलीच्या नियम ४१ नंतर, पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :—

"(४१-१) विना अनुदानित वरून अंशतः अनुदानित किंवा अनुदानित शाळा किंवा तुकडीवर बदली :—(१) विना अनुदानित किंवा अंशतः अनुदानित शाळा अथवा तुकडीमधून अनुक्रमे अंशतः अनुदानित किंवा पूर्णतः अनुदानित शाळा अथवा तुकडीतील रिक्त पदांवर खालील अटींचे पालन करून व्यवस्थापक वर्ग बदली करेल :—

(अ) (१) अशी बदली करण्यापूर्वी, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम, १९७७ कलम ५ (१) मधील तरतुदीच्या अनुषंगाने संबंधित व्यवस्थापन व शिक्षणाधिकारी/विभागीय शिक्षण उप संचालक अतिरिक्त शिक्षक उपलब्ध नसतील याची खात्री करेल.

(२) अतिरीक्त शिक्षक उपलब्ध असल्यास व्यवस्थापक वर्ग अशा प्रकारे आपल्या कोणत्याही कर्मचा-यांची बदली करणार नाही ;

(ब) स्वयं अर्थसहाय्यित शाळांमधील कर्मचा-यांची बदली व्यवस्थापन करणार नाही ;

(क) अशी बदली करण्यापूर्वी उमेदवाराने सदर व्यवस्थापनाच्या विना अनुदानित, अंशतः अनुदानित शाळेमध्ये अथवा तुकडीमध्ये कमीत कमी ५ वर्षे सेवा पूर्ण केलेली असावी ;

(ड) अशी बदली करताना प्राथमिक कडून उच्च प्राथमिक, उच्च प्राथमिक कडून माध्यमिक, माध्यमिक कडून उच्च माध्यमिक, उच्च माध्यमिक अध्यापक महाविद्यालय अशी अथवा उलट क्रमाने असमान पदावर बदली करता येणार नाही ;

(इ) अशी बदली केवळ सेवाज्येष्ठतेचे पालन करून व विषयाची गरज लक्षात घेता करता येईल ;

(फ) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) (सुधारणा) नियम, २०१७ अधिसूचित झालेल्या दिनांकापूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकाच्या नियुक्तीस शिक्षणाधिकारी अथवा विभागीय शिक्षण उप संचालकाने मान्यता दिली असल्यासच सदर शिक्षक बदलीस पात्र असेल;

(ग) रिक्त पदावरच बदली करता येईल ;

(ह) अशा बदलीस प्रकरणपरत्वे शिक्षणाधिकारी किंवा उप संचालक यांची पूर्वपरवानगी आवश्यक राहील.

(२) या नियमाखाली बदली केल्यानंतर रिक्त झालेले पद मूळ नियमावलीच्या नियम ९ (२) मधील प्रक्रियेनुसार भरणे बंधनकारक राहील.

(३) अशा प्रकारे बदली केलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यास शासन वेळोवेळी निश्चित करेल त्यानुसार वेतन अनुदान देय राहील.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चारुशीला चौधरी,**
शासनाच्या उप सचिव.

## SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 11th October 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA EMPLOYEES OF PRIVATE SCHOOLS (CONDITIONS OF SERVICE) REGULATION ACT, 1977.

No. Sankirn-2019/C.R.341/TNT-1.— The following draft of rules, which the Government of Maharashtra proposes further to amend the Maharashtra Employees of Private Schools (Conditions of Service) Rules, 1981, in exercise of the powers conferred by sub-sections *(1)* and *(2)* of section 16 of the Maharashtra Employees of Private Schools (Conditions of Service) Regulation Act, 1977 (Mah. III of 1978), and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section *(3)* of section 16 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 26th October, 2019.

2. Any objection or suggestion which may be received by the Additional Chief Secretary, School Education and Sports Department, Mantralaya Annex, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft, before the aforesaid date, will be considered by the Government.

DRAFT RULES

1. These rules may be called the Maharashtra Employees of Private Schools (Conditions of Service) (Amendment) Rules, 2019.

2. In rule 2 of the Maharashtra Employees of Private Schools (Conditions of Service) Rules, 1981 (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub-rule *(1)*,—

(*1*) in clause (e-1) " Teachers Eligibility Test " means the test conducted by the State Government or Central Government or the agency authorized by the State Government or Central Government, for candidates to be eligible to appear for Aptitude Test ; " ;

(*2*) after clause (*g*), the following clause shall be inserted, namely :—

" (*g-1*) " partially aided school " means a school which receives partial grant-in-aid from the Government or local authority ; " ;

(*3*) after clause (*i*), the following clause shall be inserted, namely :—

" (*i-a*) " self-financed school" means the school established under the Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012, which is not receiving any grant-in-aid, from the Government or local authority ; " ;

(*4*) after clause (*l*), the following clause shall be added, namely :—

" (*m*) " un-aided school " means a school other than aided school which is not receiving any grant-in-aid from the Government or local authority ; ".

3. In rule 6 of the principal Rules, for sub-rule (*2*), the following sub-rules shall be substituted, namely :—

" (*2*) The Government or the agency authorized by the Government shall conduct the Teachers Eligibility Test for the appointment of teachers or *Shikshan Sevaks*, for standard I to VIII in the private aided schools, partially aided schools, un-aided schools and schools eligible for grant- in- aid (excluding self- finance schools), from time to time.

(*2A*) The Government or the agency authorized by the Government shall conduct the Aptitude Test for the appointment of teachers or *Shikshan Sevaks* (excluding appointment on compassionate ground), for standard I to VIII in the private aided schools, partially aided schools, un-aided schools and schools eligible for grant- in- aid, from time to time.

(*2B*) The Government or the agency authorized by the Government shall conduct the Aptitude Test for the appointments of teachers or *Shikshan Sevaks*, for standard IX to XII, in private aided schools, partially aided schools, un-aided schools and schools eligible for grant- in- aid (excluding self- financed schools and appointment on compassionate ground), from time to time.".

4. In rule 9 of the principal Rules, for sub-rule (*2-B*), the following sub-rules shall be substituted, namely :—

" (*2B*) The advertisement shall be kept open for at least fifteen days before filling of the concerned post. The candidate may apply for vacant post in response to the said advertisement through online process or by making an application in writing giving details regarding name, address, date of birth, educational and professional qualifications, experience with the marks secured in the Aptitude Test.

(*2C*) After completion of the period mentioned in the advertisement, the Education Officer or Deputy Director, as the case may be, shall communicate the names of the candidates, who have passed the Aptitude Test, to the Management through online process in proportion 1:10 for one vacant post. The selection of the candidate shall be made by the school committee on the basis of interview. If the school committee does not select candidate having higher marks in the Aptitude Test, the Management shall record the reasons for the same :

Provided that, the Management may also select the candidates who have passed the Aptitude Test directly from the online merit list maintained by the Education Director, without taking interview.

(*2D*) The Management shall publish the names of the selected candidates within five working days on *Pavitra* web portal and shall also communicate the names of the selected candidates to the concerned Education Officer or Deputy Director, as the case may be.".

5. After rule 41 of the principal Rules, the following rule shall be inserted, namely :—

" ***41A. Conditions for transfer of teacher from un-aided to partially aided or aided school or division.***—(1) The management may transfer a teacher from un-aided school or partially aided school to the vacant post in partially aided school or aided school or division only if the following conditions are satisfied, namely :—

(*a*) (*i*) the Management and Education Officer or Deputy Director shall, before making such transfer, verify that there is no surplus persons are available as provided in sub-section *(1)* of section 5 of the Act ;

(*ii*) if the surplus persons are available, the Management shall not make such transfer ;

(*b*) the transfer shall not be made from the teachers of self-financed school of the Management ;

(*c*) before making such transfer, the teacher should have completed minimum five years continuous service in un-aided school or division or partially aided school or division of the Management ;

(*d*) the transfer shall be made in equal or same cadre. The transfer shall not be made from primary to higher primary, higher primary to secondary or secondary to higher secondary or higher secondary to D. El. Ed. schools or vice- versa ;

(*e*) the transfer shall be made only by following the seniority and as per the requirement of the subject ;

(*f*) before making transfer of a teacher, his appointment should have been approved by the Education Officer or Deputy Director, as the case may be ;

(*g*) the transfer shall be made on the vacant post ;

(*h*) the transfer shall be subject to the approval of Education Officer or Deputy Director, as the case may be.

(*2*) If the post becomes vacant due to transfer, such vacant post shall be filled as per the procedure provided in rule 9.

(*3*) The transferred teacher shall be eligible for scale of pay and allowances as decided by the Government, from time to time. ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

CHARUSHILA CHAUDHARI,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.